SMBT

# Jan 2024

LOKMAT TIMES

SMBT

LOKMAT TIMES • **Anchor**

# TAVI surgery on elderly woman successful

## Cheaper alternative to open-heart surgery at SMBT Hospital

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, JAN 13

A Transcatheter Aortic Valve Implantation (TAVI) surgery was performed successfully on a 72-year-old woman suffering from Acute Aortic Stenosis in the left ventricle of her heart at SMBT Hospital, recently. Director of the Cardiology Department and senior cardiologist at SMBT Hospital, Dr Gaurav Verma, along with his team, successfully performed the surgery.

Dr Verma said that the success of this surgery is an important milestone in the field of medicine. He mentioned that TAVI surgery is being performed at minimal cost in SMBT Hospital, which is proving to be a boon for common patients.

According to information available, this elderly woman from Nashik, Yamunabai Vyavhare (72), had been experiencing respiratory distress for some time. She was experiencing fatigue, weakness, blurred vision, discomfort in the chest, and waking up repeatedly from sleep. She went through several tests in Nashik, and her 2D EchoCardiography test report revealed Acute Aortic Stenosis in her heart.



Her relatives admitted her to several hospitals for treatment, but the doctors said that due to her age and heart problem, treating her would involve high risk. They then rushed her to Mumbai, where they were told about the TAVI option. But the cost there was prohibitive and the family was in distress. Then they came to know about SMBT Hospital in Nashik where TAVI surgery is also performed.

Explaining the condition, Dr Verma said, "In this condition, the valves of the aorta do not open properly due to some obstruction. This blockage in the blood flow was causing great strain on the patient's heart and due to this, the heart became weak."

Due to insufficient blood circulation in the body, the patient was suffering from low blood pressure. The kidneys of the patient were adversely affected, and the health was deteriorating rapidly. Due to an obstruction in the aortic valve and left ventricular failure, there was swelling in the lungs due to the accumulation of blood in the lungs. This was the situation in which the patient was admitted to SMBT Hospital.

The oxygen level in the body had reduced alarmingly and the patient was feeling breathlessness. Considering the urgency of resolving the issue of Aortic Stenosis, Dr Verma advised TAVI surgery to the family. For this, the elderly lady was admitted to the hospital several days before the surgery.

"A permanent pacemaker was implanted two days after the TAVI surgery. The patient's heart started working properly after both surgeries, thanks to the new valve, because of which, the blood pumped by the heart does not face any impediment now to reach the various organs, and the patient will soon feel comfortable as before," Dr Verma informed.

> My mother's health had deteriorated significantly. We had admitted her to a hospital in Mumbai, but her condition did not improve. Many doctors suggested that we take her home. Later, we admitted her to SMBT Hospital. Dr Verma provided much-needed comfort to our entire family and handled my mother with great care. Subsequently, preparations for her surgery were made, and today, she feels much better. She received better treatment compared to Mumbai, and at far lesser cost. Today, my mother can speak clearly and walk on her own.
>
> **- Vijaya Walzade,** Daughter of the patient

### What is TAVI surgery?

TAVI surgery is an alternative to open heart surgery. This is an advanced valve replacement surgery. A catheter is inserted through the thigh of the patient and an artificial valve is implanted at the site of the defective valve.

### Benefits of TAVI

- Lesser pain
- Early discharge from hospital
- Lesser bleeding
- Lesser surgical scarring



> SMBT Hospital has a team of skilled and experienced cardiologists. A lot of research on heart valves is being done here. Patients who come to us early can live happily for many years without surgery. Also, with the right surgery and proper guidance at the right time, patients can lead a long and healthy life. It is equally important for the patient to seek expert advice periodically and avoid being negligent post-surgery.
>
> **- Dr Gaurav Verma,** Director and Senior Cardiologist, SMBT Heart Institute

SMBT

नवराष्ट्र

## ओपन हार्ट सर्जरीला पर्याय

# एसएमबीटीत वयोवृद्ध महिलेवर तावी शस्त्रक्रिया



नाशिक, (वा.) श्वसनाचा त्रास होऊ लागल्याने यमुनाबाई या ७२ वर्षीय महिलेवर शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते. मात्र मुंबईत चौकशी केली असता यासाठी येणारा खर्च ऐकून नातेवाईक चिंतेत होते. मात्र त्याचवेळी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ही शस्त्रक्रिया होते असे समजल्यानंतर त्यांनी थेट एसएमबीटी हॉस्पिटल गाठले. अत्यंत गंभीर अवस्थेत असलेल्या वयोवृद्ध महिलेवर एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ट्रान्सकॅथेटर आओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लान्टेशन (तावी) शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

एसएमबीटी हॉस्पिटलच्या हृदयविकार विभागाचे संचालक आणि वरिष्ठ हृदयविकार तज्ञ डॉ. गौरव वर्मा व त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया पार पाडली. या शस्त्रक्रियेला मिळालेले यश हे वैद्यकीय क्षेत्रातील महत्वाचा मैलाचा दगड असल्याचे डॉ. वर्मा यांनी सांगितले. तावी शस्त्रक्रिया यशस्वी करणारे एसएमबीटी हॉस्पिटल उत्तर महाराष्ट्रात अग्रस्थानी असून कमीत कमी खर्चात या शस्त्रक्रिया याठिकाणी होऊ लागल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांची सोय झाली आहे.

### तावी शस्त्रक्रिया म्हणजे काय?

ओपन हार्ट सर्जरीला तावी शस्त्रक्रिया पर्याय आहे. ही अत्याधुनिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया आहे. रुग्णाच्या मांडीतून एक सुई टाकून कॅथेटरच्या साहाय्याने रक्तवाहिनीद्वारे खराब झडपेच्या जागेवर कृत्रिम झडप बसवली जाते. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अनुभवी आणि तज्ञ हृदयविकार तज्ञांची टीम आहे. याठिकाणी हृदयाच्या झडपांवर विशेष काम होत आहे. रुग्ण आमच्याकडे लवकरात लवकर दाखल झाल्यास त्यांना शस्त्रक्रियेविना अनेक वर्षे आयुष्य चांगल्या प्रकारे जगता येते. वेळीच योग्य मार्गदर्शन घेतल्यास योग्य ती शस्त्रक्रिया करून रुग्ण निरोगी जीवनाचा आनंद घेऊ शकतात. रुग्णाने शस्त्रक्रियेनंतर निष्काळजी न राहता वेळोवेळी तज्ज्ञांचा सल्ला घेणेही तितकेच महत्वाचे आहे.

देशदूत

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी 'तावी' शस्त्रक्रिया

**नाशिक । दि. १२ प्रतिनिधी**

अत्यंत गंभीर अवस्थेतअसलेल्या वयोवृद्ध महिलेवर एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ट्रान्सकॅथेटर आओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लान्टेशन (तावी) शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून ७२ वर्षीय यमुनाबाई यांना श्वसनाचा त्रास जाणवत होता. त्यांना तावी शस्त्रक्रियेचा पर्याय सुचविण्यात आला. इतर ठिकाणी याचा अधिकाधिक खर्च बघून कुटुंबीयांनी एसएमबीटीत शस्त्रक्रिया करण्याचे ठरवले. एसएमबीटी हॉस्पिटलच्या हृदयविकार विभागाचे संचालक वरिष्ठ हृदयविकारतज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा व त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. तावी शस्त्रक्रियेनंतर दोन दिवसांनी कायमस्वरूपी



पेसमेकर बसविण्यात आला. दोन्ही शस्त्रक्रिया पूर्ण झाल्याबरोबर त्यांचे हृदय नीट काम करू लागले. या शस्त्रक्रियेला मिळालेले यश हे वैद्यकीय क्षेत्रातील महत्वाचा मैलाचा दगड असल्याचे डॉ. वर्मा यांनी सांगितले. तावी शस्त्रक्रिया यशस्वी करणारे एसएमबीटी हॉस्पिटल उत्तर महाराष्ट्रात अग्रस्थानी असून कमीत कमी खर्चात या शस्त्रक्रिया याठिकाणी होऊ लागल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांची सोय झाली आहे.

### ओपन हार्ट सर्जरीला पर्याय

तावी शस्त्रक्रिया ओपन हार्ट सर्जरीला पर्याय आहे. ही अत्याधुनिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया आहे. रुग्णाच्या मांडीतून एक सुई टाकून कॅथेटरच्या साहाय्यान रक्तवाहिनीद्वारे खराब झडपेच्या जागेवर कृत्रिम झडप बसवली जाते.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अनुभवी आणि तज्ञ हृदयविकार तज्ञांची टीम आहे. याठिकाणी हृदयाच्या झडपांवर विशेष काम होत आहे. रुग्ण आमच्याकडे लवकरात लवकर दाखल झाल्यास त्यांना शस्त्रक्रियेविना अनेक वर्षे आयुष्य चांगल्या प्रकारे जगता येते. –डॉ. गौरव वर्मा

Deshdoot Edition
Jan 13, 2024 Page No. 6
Powered by : eReleGo.com

SMBT

# वयोवृद्ध महिलेवर तावी शस्त्रक्रिया यशस्वी

लोकनामा प्रतिनिधी

## एसएमबीटी हॉस्पिटल; ओपनहार्ट सर्जरीला पर्याय

**नाशिक :** एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ज्येष्ठ महिलेवर ट्रान्सकॅथेटर आओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लान्टेशन (तावी) शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून त्या महिलेला श्वसनाचा त्रास जाणवत होता. त्यांच्यावर उपचार करणे हाय रिस्क असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ही शस्त्रक्रिया होते, असे समजल्यानंतर त्यांनी थेट हॉस्पिटल गाठले. त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. अधिक माहिती अशी की, वयोवृद्ध महिला यमुनाबाई व्यवहारे (रा. नाशिक) यांना शस्त्रक्रियेपूर्वी महिनाभरापासून धाप



लागणे, अशक्तपणा, अंधारी येणे, छातीत अस्वस्थ वाटणे आणि झोपेतून सतत जाग येणे अशी लक्षणे जाणवत होती. रुग्णाच्या कुटुंबीयांनी त्यांना नाशिकमधील अनेक हॉस्पिटल व मुंबईतही उपचारासाठी दाखल केले. मात्र, वय जास्त असल्याने डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी तयार होत नव्हते. यादरम्यान त्यांनी नाशिकमध्ये त्यांच्या अनेक चाचण्या करून घेतल्या होत्या. त्यांच्या टूडी इको कॉर्डिओग्राफीच्या रिपोर्टमध्ये त्यांना तीव्र स्वरूपाचे आओर्टिक स्टेनॉसिस असल्याचे निदान झाले. शरीरात अपुरे रक्ताभिसरण होत असल्याने रुग्णाला कमी रक्तदाबाची समस्या निर्माण झाली होती. त्यांच्या किडन्यांवर विपरित परिणाम झाला होता. त्यांची तब्येत वेगाने ढासळत होती. अशा परिस्थितीत त्यांना पुढील उपचारांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परिणामी, आओर्टिक स्टेनॉसिसची समस्या दूर करणे अत्यावश्यक असल्याने शरीराचा कमीत कमी छेद घेऊन करण्यात येणारी तावी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉ. वर्मा यांनी रुग्णाच्या कुटुंबीयांना दिला. शस्त्रक्रियेच्या आधी बरेच दिवस रुग्णालयात महिलेला ठेवण्यात आले. याचा महिलेच्या मानसिक स्वास्थ्यावर याचा परिणाम होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अनुभवी आणि नामांकित हृदयविकार तज्ज्ञांची टीम आहे. याठिकाणी हृदयाच्या झडपांवर विशेष काम होत आहे. रुग्ण आमच्याकडे लवकरात लवकर दाखल झाल्यास त्यांना शस्त्रक्रियेविना अनेक वर्षे आयुष्य चांगल्या प्रकारे जगता येते.

**- डॉ. गौरव वर्मा**, हृदयविकारतज्ज्ञ, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

---

माझ्या आईची तब्येत खूपच बिघडली होती. आम्ही तिला मुंबईतही दाखल केले होते. मात्र, तिची तब्येत सुधारली नाही. यानंतर आम्ही तिला एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉ. वर्मा यांनी आम्हा सर्व कुटुंबीयांना आणि आमच्या आईला खूप धीर दिला. मुंबईच्या तुलनेत स्वस्तात उपचारदेखील झाले.

**- विजया वालझाडे,** रुग्ण महिलेची मुलगी

### » तावी शस्त्रक्रिया म्हणजे काय?

ओपन हार्ट सर्जरीला तावी शस्त्रक्रिया पर्याय आहे. ही अत्याधुनिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया आहे. रुग्णाच्या मांडीतून एक सुई टाकून कॅथेटरच्या सहाय्याने रक्तवाहिनीद्वारे खराब झडपेच्या जागेवर कृत्रिम झडप बसवली जाते.

दैनिक लोकनामा

SMBT



प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते राष्ट्रपती पदक स्वीकारताना उत्तम सोनवणे, अशोक काकड, नंदू उगले, नितीन संधान, विनय देवरे, प्रमोद आहेर, प्रकाश डोंगरे, राहुल घोलप, स्वप्नील रंधे, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर नाशिकचे प्रतिनिधी, जिल्हा शासकीय रुग्णालय नाशिकचे शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे. समवेत पोलीस आयुक्त संदीप कार्णिक, विभागीय आयुक्त राधाकृष्णन गमे. (सर्व छायाचित्रे : शैलेंद्र साळी)

# 'एसएमबीटी'मध्ये वयोवृद्ध महिलेवर तावी शस्त्रक्रिया यशस्वी

## ओपनहार्ट सर्जरीला पर्याय; ४० ते ५० टक्के सवलतीत झाली शस्त्रक्रिया

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १६ : नाव यमुनाबाई. वय ७२ रा. नाशिक. गेल्या काही दिवसांपासून आजींना श्वसनाचा त्रास जाणवत होता. नातेवाइकांनी त्यांना बऱ्याच रुग्णालयामध्ये दाखल केले. आजींना हृदयाचा त्रास त्यात वय अधिक यामुळे त्यांच्यावर उपचार करणे हाय रिस्क असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. यानंतर त्यांनी मुंबईत उपचारासाठी धाव घेतली. त्यानंतर त्यांना तावी शस्त्रक्रिया यावर पर्याय असल्याचे सांगण्यात आले. मात्र, मुंबईत असणाऱ्या किमती पाहून नातेवाईक आणखीनच संकटात आले. दरम्यान, एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ही शस्त्रक्रिया होते असे समजल्यानंतर त्यांनी थेट एसएमबीटी हॉस्पिटल गाठले. अत्यंत गंभीर अवस्थेत असलेल्या वयोवृद्ध महिलेवर एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ट्रान्सकॅथेटर आओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लान्टेशन (तावी) शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



SMBT

एसएमबीटी हॉस्पिटलच्या हृदयविकार विभागाचे संचालक आणि वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा व त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया पार पाडली. अधिक माहिती अशी की, वयोवृद्ध महिला यमुनाबाई व्यवहारे (रा. नाशिक) यांना शस्त्रक्रिये आधी महिनाभरापासून धाप लागणे, अशक्तपणा, अंधारी येणे, छातीत अस्वस्थ वाटणे आणि झोपेतून सतत जाग येणे अशी लक्षणे जाणवत होती. रुग्णाच्या कुटुंबीयांनी त्यांना नाशिकमधील अनेक हॉस्पिटल व मुंबईतही उपचारासाठी दाखल केले मात्र वय अधिक असल्याने डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी तयार होत नव्हते. या दरम्यान, त्यांनी नाशिकमध्ये त्यांच्या अनेक चाचण्या करून घेतल्या होत्या. त्यांच्या टू-डी एको कार्डिओग्राफीच्या रिपोर्टमध्ये त्यांना तीव्र स्वरूपाचे आओर्टिक स्टेनोसिस असल्याचे निदान झाले. या स्थितीमध्ये महारोहिणीच्या झडपेच्या झापा काही अडथळ्यामुळे नीट उघडत नाहीत. रक्तप्रवाहामध्ये आलेल्या या अडथळ्यामुळे हृदयास प्रचंड त्रास होत होता व यामुळे त्यांचे हृदय कमकुवत झाले होते. या सर्व लक्षणांना हृदयातील डावे नीलय निकामी होणे असेही म्हटले जाते, असे डॉ वर्मा यांनी सांगितले.

# भाजपा ज्येष्ठ नागरिक आघाडीच्या वतीने घोटी रुग्णालयात मोफत तपासणी उपचार शिबिराचे आयोजन-भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर

SMBT

धुळे (श्रमराज्य.कॉम) - आज दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी भारतीय जनता पार्टी धुळे महानगरच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आघाडीच्या सुमारे दोनशे ते अडीचशे ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचारासाठी इगतपुरी जवळील घोटी येथील एस.एम. बी.टी रुग्णालयात नेण्यात आले सुमारे २५ क्रूजर गाड्यांतून सर्व ज्येष्ठ नागरिकांना येण्या जाण्याची सोय कॉलेज प्रशासनाचे जगदीश सनेर व श्री अतुल शिंदे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली.




याप्रसंगी भाजपा महानगराध्यक्ष श्री गजेंद्र भाजपा जेष्ठ नेते हिरामण आप्पा गवळी, ज्येष्ठ नागरिक आघाडी अध्यक्ष शिवाजीराव काकडे उपाध्यक्ष आनंदा चौधरी उपाध्यक्ष श्री सुनील तात्या देवरे यांची शुभेच्छा पर भाषणे झाली. याप्रसंगी नंदुभाऊ ठोंबरे, कमलाकर पाटील, नरेश तारखेडकर, राजेंद्र बागुल, सुधीर पोतदार, आनंदराव चौधरी, संतोष खंडेलवाल, प्रकाश उबाळे, शरद बिरारी, नंदू शर्मा, प्रदीप कुलकर्णी, लताबाई चौधरी, संजीवनी कुलकर्णी, सपना मोरे, लक्ष्मी ठाकूर असे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते, यावेळी अध्यक्ष गजेंद्रजी अंपळकर, हिरामण आप्पा गवळी, नंदुभाऊ ठोंबरे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करून जेष्ठ नागरिक एवढ्या पहाटे थंडीत सर्व उत्साहाने जमा झाले त्या बद्दल सर्व जेष्ठ नागरिक यांचे कौतुक करून गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून सर्व ड्ड्यइढ कॉलेजला जाणाऱ्या नागरिक व सदस्य यांना शुभेच्छा दिल्यात.

SMBT

# भाजपा ज्येष्ठ नागरिक आघाडीतर्फे घोटी रुग्णालयात मोफत तपासणी उपचार शिबिराचे आयोजन :गजेंद्र अंपळकर




♦ **धुळे । (खान्देश मैदान न्यूज)** : आज दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी भारतीय जनता पार्टी धुळे महानगरच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आघाडीच्या सुमारे दोनशे ते अडीचशे ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचारासाठी इगतपुरी जवळील घोटी येथील एस.एम. बी.टी रुग्णालयात नेण्यात आले सुमारे २५ क्रूजर गाड्यांतून सर्व ज्येष्ठ नागरिकांना येण्या जाण्याची सोय कॉलेज प्रशासनाचे जगदीश सनेर व अतुल शिंदे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली.

याप्रसंगी भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र भाजपा जेष्ठ नेते हिरामण गवळी, ज्येष्ठ नागरिक आघाडी अध्यक्ष शिवाजीराव काकडे उपाध्यक्ष आनंदा चौधरी उपाध्यक्ष सुनील देवरे यांची शुभेच्छापर भाषणे झाली. याप्रसंगी नंदु ठोंबरे, कमलाकर पाटील, नरेश तारखेडकर,राजेंद्र बागुल,सुधीर पोतदार, आनंदराव चौधरी,संतोष खंडेलवाल, प्रकाश उबाळे,शरद बिरारी,नंदू शर्मा, प्रदीप कुलकर्णी,लताबाई चौधरी,संजीवनी कुलकर्णी, सपना मोरे, लक्ष्मी ठाकूर असे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते,यावेळी अध्यक्ष गजेंद्रजी अंपळकर,हिरामण आप्पा गवळी,नंदुभाऊ ठोंबरे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करून जेष्ठ नागरिक एवढ्या पहाटे थंडीत सर्व उत्साहाने जमा झाले त्या बद्दल सर्व जेष्ठ नागरिक यांचे कौतुक करून गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून सर्व SMBT कॉलेजला जाणाऱ्या नागरिक व सदस्य यांना शुभेच्छा दिल्यात.

पुण्यनगरी

SMBT

# ‘एसएमबीटी’त वृद्धेवर ‘तावी’ शस्त्रक्रिया

ओपन हार्ट सर्जरीला पर्याय



**नाशिक :** एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अत्यंत गंभीर अवस्थेत असलेल्या ७२ वर्षीय महिलेवर ट्रान्सकॅथेटर आओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लान्टेशन (तावी) शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली. हॉस्पिटलचे वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ तथा हृदयविकार विभागाचे संचालक डॉ. गौरव वर्मा व त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया पार पाडली. या शस्त्रक्रियेला मिळालेले यश हे वैद्यकीय क्षेत्रातील मैलाचा दगड असल्याचे डॉ. वर्मा यांनी सांगितले.

नाशिकच्या यमुनाबाई व्यवहारे यांना धाप लागणे, अशक्तपणा, अंधारी येणे, छातीत अस्वस्थ वाटणे आणि झोपेतून सतत जाग येणे अशी लक्षणे जाणवत होती. कुटुंबीयांनी त्यांना अनेक ठिकाणी दाखल केले; मात्र वय अधिक असल्याने डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला. अशा परिस्थितीत त्यांना एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. येथे डॉ. वर्मा यांनी त्यांना तावी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. शस्त्रक्रियेनंतर दोन दिवसांनी कायमस्वरूपी पेसमेकर बसविण्यात आला. दोन्ही शस्त्रक्रिया पूर्ण झाल्याबरोबर त्यांचे हृदय व्यवस्थित काम करू लागल्याचे डॉ. वर्मा यांनी सांगितले.

माझ्या आईची तब्येत खूप बिघडली होती. आम्ही तिला मुंबईमध्येही दाखल केले. मात्र, तिची प्रकृती सुधारली नाही. यानंतर आम्ही तिला एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉ वर्मा यांनी आम्हाला धीर देत आईवर शस्त्रक्रिया केली. मुंबईच्या तुलनेत स्वस्तात उपचार झाले. आईच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे.

**- विजया वालझाडे,** रुग्ण महिलेची मुलगी



ओपन हार्ट सर्जरीला तावी शस्त्रक्रिया पर्याय आहे. ही अत्याधुनिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया आहे. रुग्णाच्या मांडीतून एक सुई टाकून कॅथेटरच्या साहाय्याने रक्तवाहिनीद्वारे खराब झडपेच्या जागेवर कृत्रिम झडप बसविली जाते. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अनुभवी आणि तज्ज्ञ हृदयविकार तज्ज्ञांची टीम आहे. या ठिकाणी हृदयाच्या झडपांवर विशेष काम होत आहे.

**- डॉ. गौरव वर्मा,** संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

Nashik Edition
Jan 14, 2024 Page No. 5
Powered by : eReleGo.com

लोकमत

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये वृद्ध महिलेवर तावी शस्त्रक्रिया

## ओपन हार्ट सर्जरीला पर्याय : सवलतीत उपचार



**नाशिक :** एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये गंभीर अवस्थेत असलेल्या ७२ वर्षीय वृद्ध महिलेवर ट्रान्सकॅथेटर आओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लान्टेशन (तावी) शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. हृदयविकार विभागाचे संचालक डॉ.गौरव वर्मा व त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया पार पाडली. या शस्त्रक्रियेला मिळालेले यश हे वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वाचा मैलाचा दगड असल्याचे डॉ.वर्मा यांनी सांगितले. कमीतकमी खर्चात ही शस्त्रक्रिया एसएमबीटीत होऊ लागल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांची मोठी सोय झाली आहे.

नाशिक येथील यमुनाबाई व्यवहारे यांना महिनाभरापासून धाप लागणे, अशक्तपणा, अंधारी येणे, छातीत अस्वस्थ वाटणे आणि झोपेतून सतत जाग येणे अशी लक्षणे जाणवत होती. रुग्णाच्या कुटुंबीयांनी त्यांना नाशिकमधील अनेक हॉस्पिटल व मुंबईतही उपचारासाठी दाखल केले. मात्र, वय अधिक असल्याने डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी तयार होत नव्हते. या दरम्यान, त्यांनी नाशिकमध्ये त्यांच्या अनेक चाचण्या करून घेतल्या होत्या. टू-डी एको कार्डिओग्राफीच्या रिपोर्टमध्ये त्यांना तीव्र स्वरूपाचे आओर्टिक स्टेनोसिस असल्याचे निदान झाले. त्यांना पुढील उपचारांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्यावर तावी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉ.वर्मा यांनी रुग्णाच्या कुटुंबीयांना देत शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. (वा.प्र.)

ओपन हार्ट सर्जरीला तावी शस्त्रक्रिया पर्याय आहे. ही अत्याधुनिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया आहे. रुग्णाच्या मांडीतून एक सुई टाकून कॅथेटरच्या साहाय्याने रक्तवाहिनीद्वारे खराब झडपेच्या जागेवर कृत्रिम झडप बसविली जाते. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अनुभवी आणि तज्ज्ञ हृदयविकार तज्ज्ञांची टीम आहे. या ठिकाणी हृदयाच्या झडपांवर विशेष काम होत आहे.

**- डॉ.गौरव वर्मा,** संचालक, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

Nashik Main
Page No. 4 Jan 13, 2024
Powered by: erelego.com